# देवाच्या राज्याचा प्रसार होत राहतो

## आता आणि संपूर्ण इतिहासात देवाच्या राज्याचा प्रसार कसा झाला हे येशूने उदाहरणाने दाखवले

**प्रार्थना.** ''प्रिय प्रभु, तुझे वचन ह्या मुलांना त्याच्या मित्रांच्या अंत: करणात पेरण्यास कृपा करून सहाय्य कर. तुझे वचन मुलांच्या अंत: करणात बिजा प्रमाणे रूजून वाढावे आणि त्याला फळ यावे असे होऊ दे''

मुलांचे वय आणि आध्यात्मिक गरजा ह्यांना अनुरूप असे कार्यक्रम

निवडा येशूने सांगितलेला चार प्रकारच्या जमीनींचा वृत्तांत **मत्तय 13:3-9 व 18-23** ह्या शास्त्रभागातून मोठया मुलाने किंवा प्रौढांनी सांगावा.



वेगवेगळ्या प्रकारचे लोक देवाची सुवार्ता ऐकतात तेव्हा काय घडते ते **सांगा.**

- शतकानुशतके देवाचे राज्य धीमेपणाने कशा प्रकारे वाढत आहे हे ह्या वृत्तांतातून समजते.
- काही लोक येशूचे शब्द नाकारतात तर इतर ते स्वीकारतात
- सैतान देवाच्या लोकांवर हमला करतो परांद देवाचे वचन सतत वाढत रहासे आणि लवकरच जगातील सर्व लोकांमध्ये आपले मूळ धरेल.

**मुलांना पुढीला प्रश्न विचारा:**



- तीन प्रकारच्या जमीनी वाईट होत्या. त्यांच्या मध्ये काय दोष होता?
- बी कोठे क से रूजते वाढते व तिला फळ येते?
- शुभवर्तमानाची सुवार्ता ही बी प्रमाणे कशी आहे?
- बी चांगल्या सुपीक जमीनीत पडल्यावर काय घडते?
- कोणत्या प्रकारचे लोक निकृष्ट जमीनीसारखे असतात?
- लोक सुवार्ता ऐकून त्यावर विश्वास ठेवतात तेव्हा काय घडते?

### चार प्रकारच्या जमीनींच्या वृत्तांताच्या भागांचे नाटयीकरण करा

- मुलांना मोठया माणसांसमोर नाटिका सादर करता यावी यासाठी उपासनेच्या पुढाऱ्याशी चर्चा करा.
- मुलांना शिकवताना तुम्ही नाटिकेची तयारी करा.
- मोठया मुलांनी लहान मुलांची तयारी करून घ्यावी.
- पुढील भूमिका मोठया मुलांना किंवा प्रौढांना करायला द्या.
  **निवेदक,** वृत्तांत थोडक्यात सांगा आणि मुलांना त्यांनी काय बोलायचे ते शिकववा
  **शेतकरी** विया म्हणून लहान लहान खडे ह्या किंवा कागदाच्या बिया तयार करा.
  **काटे.**
- **लहान मुलांना पक्षी, गव्हाची शेते** आणि **खुरटलेली झुडपे** ह्या भूमिका करायला द्या.

**निवेदक:** मत्तय 13:3-9 ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा पहिला भाग सांगा आणि मग म्हणा, ''रस्त्यावर बी पडले म्हणजे काय होते ते पाहा''

**शेतकरी:** थोड्याशा मूठभर बिया पेरा (फेका).

**पक्षी:** बिया पडलेल्या आहेत तिकडे उडया मारत जा, तुमच्या हातांचा वापर पंख म्हणुन करा मग काही बिया उचलून त्या खाल्ल्याचा अभिनय करा. (बिया प्रत्यक्षात खाऊ नका)

**निवेदक:** ''बिया खडकाळ जमिनीवर पडल्यावर काय घडते ते पाहा,''

**शेतकरी:** आणखी काही बिया पेरा

**गव्हाची शेते:** जिथे बिया पडलेल्या असतील तिथे तुमचे हात बाजूला पसरून काही वेळ उभे राहा मग वर तळपत्या सुर्याकडे पाहा. तुमचे हात डोळ्यांवर आडोशासाठी धरा आणि हळूहळू जमिनीवर पडा.

**निवेदक:** ''बिया काटेरी झुडुपांमध्ये पडल्यावर काय होते ते पाहा,''

**शेतकरी:** आणखी बिया पेरा.

**झुडुप:** बिया पडल्या तिथे तुमचे हात पसरून उभे राहा.

**काटे:** गव्हाच्या शेतात हळूच मागून येउन उभे राहा, चवठयावर उभे राहा मग दुष्टपणाने मोठयाने हसा आणि एकदम तुमचे नख त्याच्या गळयाला लावून त्याचा श्वास कोंडल्याचा अभिनय करा.

**वाढ खुटलेले झुडुप:** तुमचे हात स्वत:च्या गळयावर ठेवा, तुभची जीभ बाहेर काढा आणि मग खाली पडा.

**निवेदक:** ''बिया चांगल्या सुपीक जमीनीवर पडल्यावर काय होते ते पाहा''

**शेतकरी:** आणखी काही बिया पेरा

**गव्हाची शेते:** जेथे बिया पडलेल्या आहेत तेथे मोठया डौलाने उभे राहा तुमचे हात स्वर्गाच्या दिशेने उभारलेले ठेवा,

**शेतकरी:** ''पाहा! ह्या बियांपासून शंभरपट पिक आलं! चांगले पिक आल्याबद्दल देवाची स्तुती असो.

**निवेदक:** मत्तय 13:18-23 ह्या शास्त्रभागातून वृत्तांताचा दुसरा भाग सांगा.

मग नाटिकेसाठी साहाय्य करणाऱ्या प्रत्येकाचे आभार माना,

## प्रश्न

मुले मोठया माणसांसमोर नाटिका सादर करणार असतील तर मुलांना पान क्र. 1 परील प्रश्न त्यांना विचारू द्या.

मुलांना अंकुर फुटलेल्या बियांचे चित्र काढायला द्या. हे चित्र ते उपासनेच्या दरम्यान मोठया माणसांना दाखवून देवाचे वचन एखाद्या बीसारखे आहे, ते आमच्या अंत: करणात रूजते, वाढते आणी त्याला चांगली फळे येतात हे समजावून सांगतील.

**कविता.** तीन मुले निवडा, त्यापैकी प्रत्येकाला **स्तोत्र 1:1-3** ह्यातून एकेक वचन म्हणायला सांगा:

जो पुरूष दुर्जनांच्या मसलतीने चालत नाही
 पापी जनांच्या मार्गात उभा राहत नाही
आणि निंदकांच्या बैठकीत बसत नाही.
तर परमेश्वराच्या नियमशास्त्रात रमतो,
 त्याच्या नियमशास्त्राचे रात्रंदिवस मनन करितो तो धन्य.
जे झाड पाण्याच्या प्रवाहा जवळ लाविलेले असते.
जे आपल्या हंगामी फळ देते, ज्याची पाने
 कोमेजत नाहीत, अशा झाडासारखा तो आहे,
आणि जे काही तो हाती घेतो ते सिध्दीस जाते.





**मोठया मुलांना चार** प्रकारच्या जमीनी व त्यांची प्रतिके याविषयी कविता किंवा गीत लिहिण्यास सांगा.

**पाठ करा प्रे. कृ. 4:12**

**प्रार्थना:** ''प्रिय येशू तुझ्या विषयी लोकांना सांगून तुझ्या राज्याचे बिज पेरण्यास आमचे साहाय्य कर. तुझ्या वचनाने आमच्या अंत: करणांत मूळ धरावे आणि त्याला चांगली फळे यावीत अशी आमची इच्छा आहे''

Copyright 2005 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net